**<u>नियमित दिवाणी दावा क्रं. ९८/२०१९</u>**

**<u>निशाणी क्रमांक ३९/ सोबत</u>**

**<u>प्र.वादी तर्फे विधिज्ञ श्री.व्ही.बी.पाटील यांचेमार्फत शपथेवर पुढील उलटतपास सुरूः-</u>**

हे म्हणणे खरे आहे की, माझी आई शिरमाबाई हिचे ४० तोळे सोने व ७५० ग्रॅम चांदीचे दागिने असल्याचे कागदोपत्री पुरावा मी सदर प्रकरणात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई शिरमाबाई यांच्याकडे पाच तोळयाच्या चार बांगडया, पाच तोळयाच्या दोन पट्टया, चार तोळयाचा कोल्हापूरी साज, चार तोळयाची दोन पदरी मोहनमाळ, चार तोळे दोन पदरी मंगळसूत्र, दोन तोळे काळया मण्याचे मंगळसूत्र, दिड तोळयाची चेन, एक तोळयाची बोरमाळ, पाच तोळयांचे तोडे, एक एक तोळयाच्या दोन अंगठया, कर्णफुले, अंगठी, रिंगा वाळे दोन हे सर्व पाच पाच ग्रॅम प्रत्येकी होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे हातातील एक एक तोळयाच्या दोन अंगठया, चांदीचा कमरपट्टा, चांदीचे रूपये २० नग, करदोरा या सर्वांचे वजन ७५० ग्रॅम इतके होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला त्रास देण्याकरीता माझ्या आई वडीलांकडे सोने व चांदीचे दागिने होते हे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत १अ व १ब या बाबत वादी, प्रतिवादी, चुलते शंकर, भाऊ व विलास यांमध्ये दि.३१/०५/१९९९ रोजी तडजोड झालेली आहे. दि.१८/०३/२००० साली विलास सुर्यवंशी, तानाजी सुर्यवंशी व माझे भाऊ यांच्यामध्ये दस्त क्रं.१४१९/२००० चे वाटणीपत्र झाले किंवा कसे हे मला माहित नाही. सन २००० साली वाटणीपत्र झाले किंवा कसे हे मला माहित नाही. दत्तात्रय संकपाळ माझे पती आहेत. लग्न झालेपासून मी माझ्या पती सोबत राहते. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३/०६/१९९६ रोजी च्या वाटणीपत्राच्या स्मरणपत्रास माझ्या पतीने साक्षीदार म्हणून सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझ्या पतीने वाटणीचे स्मरणपत्र झाल्याचे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २००० सालीच वाटणी झाल्यामुळे मला दावा मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा अधीकार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती १अ मध्ये तानाजी व विलास यांच्या वारसांनी घर बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते घर बांधत असल्याचे मला माहित होते.

अंदाजे किती वर्ष घर बांधून झाले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वाटणी झाल्यामुळे माझा हिस्सा सोडून दिलेला आहे.

प्रतिवादी क्रं.११ रंजना गवळे माझी बहिण आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटणी झाल्याबाबतचे व प्रतिवादीचे दावा मिळकती मध्ये असलेल्या स्वतंत्र वहिवाटीबाबत मला व माझ्या इतर बहिणींना माहित होते. हे म्हणणे खरे आहे की, आई वडील हयात असेपर्यंत माझे त्यांच्याकडे जाणे-येणे होते.

हे म्हणणे खरे नाही की, वडील हयात असताना त्यांनी वाटणी करून दिल्याबाबतचे मला सांगितले होते. वाटणी नंतर हिस्सायाला आलेल्या जमीनीबाबतचे व्यवहार तानाजी व विलास यांनी केले किंवा कसे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आई वडील व माझे भाऊ मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांना त्रास देण्याकरीता हा खोटा दावा दाखल केला आहे. माझ्या व माझी बहिण रंजना गवळे मध्ये कोणत्याही प्रकारची केस प्रलंबित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीना त्रास देण्याकरीता मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास संपला.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

sd/-

**दिनांक - २०/०३/२०२६.** **( आर. एस. मोरे )**

**ठिकाण - पेठवडगाव.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**

**पेठवडगाव.**